संफौ.ख.नं.४१०/२०२१

**निशाणी क्र.०९ लगत**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव - समिंदर महादेव करे ,**

वय - ४२ वर्षे, व्यवसाय – पोलिस हवालदार, बक्कल नं.१८३५

नेमणुक – कामशेत पोलिस स्टेशन.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

**१.** मी दि.०९/०५/२०२१ रोजी भिगवण पोलिस ठाणेत पोलिस नाईक म्हणून कार्यरत होतो. दिनांक ०९/०५/२०२१ रोजी ठाणे अंमलदार यांनी गुन्हा दाखल करुन वरिष्ठांच्या आदेशाने त्याचा तपास माझ्याकडे दिला. मी तपासकामी दोन साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली आहेत. गुन्ह्याचा छापा व पंचनामा हे दोन्ही फिर्यादी वारगड यांनी केले असुन मी केवळ दोन साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवून दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपी आज कोर्टात हजर आहे. मी त्याला ओळखतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.आर नगरे यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

**२.** हे खरे नाही की, वारगड यांना संपूर्ण तपासकाम करणे शक्य होते. हे खरे की, मी स्थानिक लोकांचे जबाब नोंदवलेले नाहीत. हे खरे नाही की, मी खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र न्यायालयात पाठविले. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.09.24 18:30:35 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.२४/०९/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**